www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

UPSC CSE 2014 MAINS PAPER 7 DECEMBER 19, 2014 MARATHI OPTIONAL PAPER II QUESTION PAPER

# MARATHI

## Paper—II

## (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 250*

**QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS**

**Please read each of the following instructions carefully before attempting questions :**

There are **EIGHT** questions divided in **Two Sections**.

Candidate has to attempt **FIVE** questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** question from each section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in **MARATHI**.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the answer book must be clearly struck off.

---

## SECTION—A

Q.1. **पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी 150 शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा :—** **10×5=50**

Q. 1(a) "आपण मनाई हुकूम तोडला म्हणून तो आता भडकून गुराढोरासारखा आपल्याला बडविणार आणि घरी गेल्यावर सासू जळत्या कोलीताने समाचार घेणार, उपाशी ठेवणार, या कल्पनेने तिला मागे फिरण्याची इच्छा होऊ लागली. परंतु तिला मागे फिरता येत नव्हते. मागे फिरले तरीही मार पडणारच होता.'' 10

Q. 1(b) "मी मानेनं नकार दर्शवितो. क्षणात हाकेच्या अंतरावर गेलेला असतो. पण माय मात्र जागच्याजागीच खिळून असते. तिनं उजव्या हातात लुगड्याचा पदर उंचावून धरला असतो. कधी कधी तो डोळ्यांना भिडला असतो.'' 10

Q. 1(c) "आयुष्य तुझं आहे. त्यातले निर्णय तू घ्यायचेस. मी तुझा निषेधही करत नाहिये आणि वाहवाही. पण निदान तू स्वत:ची प्रतारणा करू नकोस.'' 10

Q. 1(d) "मला वाटलं आता वाटेतच चेलमा है व पाणी बी काळं भोर दिसतंय व उतीम लोक कोणी बी दिसत नाही तर पिऊन घ्यावं पाणी व चालतं व्हावं. पुढे बऱ्याच अंतरावर पाणी होतं. पण तितक्या लांब जाण्यापेक्षा इथंच प्यावं पाणी असं वाटू लागलं.'' 10

Q. 1(e) "तव रंभाइसें काइ नेणों : कवणेंसी कटकट करीत होतीं : तें भटोबासीं आइकीलें आणि म्हणितलें : हां वो रंभाइ : तूं अखंड कटकट करीतसि : तूं जाये : म्हणौनि दवडीली : सिवीया दीधलीया : यैसे कोपले : मग तियें विजना गेली : विजन केलें : माधौति वेळेंसि आली : भटोबासी दंडवत केलें :''

www.prepp.in

Q. 2. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 2(a) 'स्मृतिस्थळ'च्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 15

Q. 2(b) महात्मा जोतिबा फुले यांनी ज्ञानाची, विद्येची महती समाजमनावर कशी बिंबवली, त्याचे विश्लेषण करा. 15

Q. 2(c) 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतून प्रकट होणाऱ्या आधुनिकतेचे स्वरूप उलगडून दाखवा. 20

Q. 3. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 3(a) " 'साष्टांग नमस्कार' या नाटकाने मराठी विनोदाला बहुमुखी आणि बहुरंगी बनविले आहे" या विधानाची चर्चा करा. 20

Q. 3(b) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीत मार्क्सवादाचा प्रभाव कितपत जाणवतो त्याची चिकित्सा करा. 15

Q. 3(c) विदर्भातील निम्नस्तरीय जीवनात चालू असलेला दारुण संग्राम उद्धव शेळके यांच्या कथांमधून कसा प्रकट झालेला आहे, ते सोदाहरण सांगा. 15

Q. 4. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 4(a) बाबूराव बागूल यांच्या कथालेखनात प्रकट झालेल्या अन्यायाविरुद्धच्या आक्रमकतेचे स्वरूप स्पष्ट करा. 15

Q. 4(b) स्त्री-पुरुष संबंधातील ताण हे 'एकेक पान गळावया' चे मध्यवर्ती आशयसूत्र आहे काय ?—चर्चा करा. 20

Q. 4(c) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाच्या आधारे प्र. ई. सोनकांबळे यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष वर्णन करा. 15

## SECTION—B

Q.5. **पुढील पाच पद्यखंडांचे प्रत्येकी 150 शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा :—** **10×5=50**

Q. 5(a) "भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली
हे हात माझे सर्वस्व, दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले" 10

Q. 5(b) "वा तांडव करिता सोम प्राशुनी काली
रक्तात नाहली शिरमुंडावळ भाली
थयथया नाचता नरड्यांवर प्रेतांच्या
हे कंकण निखळुनि पडले भूवर खाली" 10

Q. 5(c) "नको मोजू माझ्या
मुक्तीची अंतरे;
ब्रह्मांडाची दारे
बंद झाली." 10

Q. 5(d) "दिवसेंदिवस माणसं अशी छोटी छोटी होत जातायत
चुका आपण करतो
दोष सैतानाला देतो" 10

www.prepp.in

Q. 5(e) "मुखी नाम हाती टाळी। दया नुपजे कोणे काळी।।
काय करावे ते गाणे। धिक् धिक् ते लाजिर वाणे।।
हरिदास म्हणोनी हालवी मान। कवडीसाठी घेतो प्राण।।
हरिदासाचे पायी लोळे। केशी धरोनी कापी गळे।।" 10

Q. 6. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 6(a) ज्ञानदेवांच्या कार्याचे वर्णन नामदेवांनी कसे केले आहे, आणि त्यातून त्यांच्या ज्ञानदेवांविषयीच्या भावना कशा व्यक्त होतात, ते सांगा. 15

Q. 6(b) संतांच्या आणि पंडितांच्या कवितेपेक्षा शाहिरी काव्य अगदी वेगळ्या प्रकारचे कसे होते, त्याचे विवेचन 'पैंजण' मधील कवितांच्या आधारे करा. 20

Q. 6(c) 'दमयंतीस्वयंवर' या काव्यातील प्रसंगनिर्मितीचे कौशल्य वर्णन करा. 15

Q. 7. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 7(a) बालकवींनी निसर्गातील विविध घटकांना मानवी भावना कशा प्रदान केल्या आहेत, ते सोदाहरण वर्णन करा. 15

Q. 7(b) केशवसुतांच्या सामाजिक आशयाच्या कवितांचा वारसा कुसुमाग्रज यांनी पुढे चालविला असे म्हणता येईल का, ते 'विशाखा' मधील कवितांच्या आधारे ठरवा. 20

Q. 7(c) दाहक प्रेमवंचनेचा खोल कडवट अनुभव करंदीकरांच्या प्रेमकवितेत कसा व्यक्त होतो, ते 'मृद्गंध' मधील कवितांच्या आधारे सांगा. 15

Q. 8. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 8(a) 'जाहीरनामा' या कवितासंग्रहातील कवितांमधून प्रकट झालेले दु:ख आणि दारिद्र्य यांचे स्वरूप वर्णन करा. 15

Q. 8(b) ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' मधील प्रतिमासृष्टीचे वेगळेपण स्पष्ट करा. 20

Q. 8(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहातील कवितांचे आकृतिबंध विविध पातळ्यांची सरमिसळ करून कसे बनलेले आहेत, ते विशद करा. 15